**<u>नियमित दिवाणी दावा क्र. २८४/२०१२ मध्ये निशाणी क्र. ७३ कडील अर्जावर आदेश.</u>**

१) प्रस्तुतचा अर्ज वादींतर्फे त्यांच्याविरुध्द निशाणी क्र. १ वर दिनांक ०९/०८/२०२४ रोजी पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन निशाणी क्र. ७२ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे साक्षीदाराला साक्षी समन्स पाठविण्याबाबत दाखल केला आहे.

२) प्रस्तुत अर्जास म्हणणे देण्याबाबत प्रतिपक्षास आदेशित केले आहे. परंतु प्रतिवादींनी प्रस्तुत अर्जास म्हणणे दाखल केले नाही. त्यामुळे प्रस्तुत अर्ज प्रतिवादींच्या म्हणण्याशिवाय पुढे चालविण्याबाबत प्रस्तुत अर्जावर आदेश पारीत केला आहे.

३) प्रस्तुत अर्जाच्या कामी वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुत अर्जाच्या युक्तिवादाकामी प्रतिवादींना व त्यांच्या विद्वान वकीलांना वारंवार पुकारले असता गैरहजर असल्याने प्रस्तुत अर्जावर प्रतिवादींतर्फे युक्तीवाद नाही असा आदेश पारीत केला आहे. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

४) वादींच्या विद्वान वकीलांचा युक्तिवाद ऐकला असता व रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, दिनांक ०९/०८/२०२४ रोजी दुपारी ०१.३२ वाजेपर्यंत वादींना व वादींच्या विद्वान वकीलांना पुकारले असता गैरहजर असल्याने व वादींनी पुढील पुरावा सादर न केल्याने वादींचा पुरावा बंद करण्यात आल्याबाबत निशाणी क्र. १ वर आदेश पारीत केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन करता असे दिसून येते की, उपअधिक्षक भूमी अभिलेख, कराड अगर निमतानदार श्री घोरपडे यांना साक्षी समन्स काढण्याबाबत वादींनी निशाणी क्र. ६९ कडील अर्ज दाखल केला आहे. साक्षीभत्ता देण्याच्या अटीवर सदर अर्जातील नमुद साक्षीदाराला साक्षी

समन्स काढण्याबाबत न्यायालयाने आदेश पारीत केला आहे. निशाणी क्र. ६९ कडील अर्जावरील आदेशाप्रमाणे निशाणी क्र. ७१ नुसार साक्षीदाराला साक्षी समन्स पाठविले आहे व सदरचे साक्षी समन्स बजावून परत आले आहे. त्यानंतर वादींनी पुन्हा सदर साक्षीदाराला साक्षी समन्स काढण्याबाबत निशाणी क्र. ७२ कडे अर्ज दिला आहे. साक्षीदाराला पुन्हा साक्षी समन्स काढण्याबाबत निशाणी क्र. ७२ आदेश पारीत झाला आहे. वादींचा निशाणी क्र. ६९ कडील साक्षी समन्सचा अर्ज मंजुर झाला असल्याने माझ्या मते निशाणी क्र. १ वर दिनांक ०९/०८/२०२४ रोजी वादींविरुद्ध पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करुन निशाणी क्र. ६९ कडील अर्जावरील आदेशानुसार वादींनी नियमानुसारचा साक्षी भत्ता न्यायालयात जमा करण्याच्या अटीवर सदर अर्जातील नमुद साक्षीदाराला साक्षी समन्स पाठविणे न्यायाचे व उचित आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आदेश</u>

१) निशाणी क्र. १ वर दिनांक ०९/०८/२०२४ रोजी वादींविरुद्ध पारीत करण्यात आलेला पुरावा बंदचा आदेश रद्द करण्यात येतो.

२) निशाणी क्र. ६९ कडील अर्जावरील आदेशानुसार वादींनी नियमानुसारचा साक्षी भत्ता न्यायालयात जमा केल्यावर सदर अर्जातील नमुद साक्षीदाराला पुन्हा साक्षी समन्स पाठविण्यात यावे.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2024.10.04 17:48:51 +0530

(पां. लिं. घुले)

दिनांक– ०४/१०/२०२४ २रे सह दि. न्या. व. स्तर, कराड.